# *होमगार्ड- जालना जिल्हा*

*पोलीस मुख्यालयाचे मागे,पोलीस दवाखाना*

E-mail:dchgjalna@yahoo.com

जा.क्र. **343** /प्रशि/2024 दिनांक:- 13.09 .2024

जालना जिल्हाहोमगार्ड नविन होमगार्डसदस्य नोंदणी 2024

**सुधारित अंतरिम निवड व प्रतिक्षा यादी बाबत जाहीर अधिसुचना**

जालना जिल्हा होमगार्ड सदस्य नोंदणी 2024 करीता पोलीस कवायत मैदान पोलीस मुख्यालय जालना येथे दि.26.08.2024 ते 30.08.2024 या कालावधीत कागदपत्रे पडताळणी व मैदानी चाचणी घेण्यात आलेली आहे.

या कार्यालयाकडुन दि.11.09.2024 रोजी पर्यत उमेदवारांकडुन आक्षेप मागविण्यात आलेले होते.कार्यालयास प्राप्त झालेल्या आक्षेपातील त्रुटिंच्या अनुषंगाने दुरुस्त्या करुन पुरुष व महिला उमेदवारांची अंतरीम निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

होमगार्ड सदस्यत्वाकरीता अंतरीम निवड उमेदवारांची गुणानुक्रमे यादी सोबत जोडण्यात आली आहे.तसेच प्रतिक्षा यादी ठेवण्यात आली असुन ही यादी दि.31.03.2025 पर्यत वैध राहील.त्यानंतर यादी संपुष्टात येईल.प्रशिक्षण संदर्भातील पुढील सुचनांकरीता https://maharashtracdhg.gov.in या संकेतस्थळावर आणि आपले पथक कार्यालयाशी संपर्कात रहावे.तसेच अंतरीम यादीत निवड करण्यात आलेल्या उमेदवारांनी **दि.14.09.2024 रोजी सकाळी 09.30 वाजता पोलीस मुख्यालय पोलीस कवायत मैदान जालना येथे कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित रहावे**.

अंतरीम यादीतनिवड झालेल्या उमेदवारांनी सोबत येतांना मुळ कागदपत्र शैक्षणीक अहर्ता (कमीत कमी 10 वी पास गुणपत्रक,10 वी बोर्ड प्रमाणपत्र जन्मतारीख नमुद असलेले/मुळ शाळा सोडल्याचे दाखला),मुळ आधार कार्ड,मतदान कार्ड ,मुळ तांत्रिक अर्हता प्रमाणपत्र व त्याच्या झेरॉक्स प्रती व दोन फोटोसह उपस्थित रहावे.तसेच आपणाकडुन बंधपत्र व हमीपत्र भरुन घेतले जाईल निवड झालेले जे उमेदवार दिलेल्या तारखेस बंधपत्र व हमीपत्र भरुन देण्यासाठी उपस्थित राहणार नाहीत.तसेच मुळकागदपत्र पडताळणी करतेवेळी काही त्रुटी निदर्शनास आल्यास अंतिम निवड यादीतुन नाव व नोंदणी रद्य करुन प्रतिक्षा यादीतील गुणानुक्रमे उमेदवारास घेण्याचे **सर्व अधिकार जालना होमगार्ड नोंदणी निवड समितीचे राहतील याची सर्व संबधित उमेदवारांनी गांभीर्याने नोंद घ्यावी**.

*प्रसिदध झालेल्या यादीतील निवड झालेले उमेदवार व मैदानी चाचणीत किमान 40 टक्के गुण घेवु न शकलेले उमेदवार वगळुन उर्वरीत सर्व उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करण्यात आली आहे.*

**तसेच निवड झालेल्या उमेदवारांची पुढे पोलीस चारित्र पडताळणी व वैद्यकिय तपासणी करण्यात येईल यामध्ये अपात्र असल्याचे दिसुन आल्यास कोणत्याही टप्यावर उमेदवारांला अपात्र केले जाईल याची नोंद घ्यावी.**

**(आयुष नोपाणी)**
**जिल्हा समादेशक होमगार्ड,**
**तथा**
**अपर पोलीस अधिक्षक,जालना**